International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

# जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवरील परिणाम

**प्रा. डॉ. दिलीप डा. खुपसे**

भाऊसाहेब भोरे शिवशक्ती महाविद्‌यालय,
बाभूळगाव, जि. यवतमाळ

भारताचे प्राथमिक क्षेत्र हे कृषी आहे कारण आपल्या देशामधील ६५ प्रतिशत जनता शेतीवर उदरनिर्वाह करते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर उद्‌योग आणि सेवाक्षेत्रासोबतच शेतीचा सुद्‌धा विकास होण्यासाठी प्रयत्न करण्यात आले परंतु, शेतीत विशाल क्षेत्र आणि मोठ्या प्रमाणावर वाढत जाणारी लोकसंख्या या दोन गोष्टींमुळे आपण प्रत्येक पंचवार्षिक योजनेमध्ये विकास दर गाठू शकले नाही असे असले तरी गेल्या पाच वर्षामध्ये शेतीमध्ये विविध तंत्रज्ञानाचा उपयोग करून कृषी उत्पादन व उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

टेबल क्र. १

एकुण अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्राचा हिस्सा

| वर्ष | राष्ट्रीय उत्पनामध्ये |
|---|---|
| २०१८-१९ | १७.६ |
| २०१९-२० | १८.४ |
| २०२०-२१ | २०.२ |

स्त्रोत - राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय (NSO) m/o सांख्यिकी आणि PI

वरील सांख्यिकीय माहितीवरून असे लक्षात येते कि, २०८-१९ या वर्षात एकुण राष्ट्रीय उत्पनामध्ये कृषी क्षेत्राचा वाटा १७.६ प्रतिशत एकुण होता यामध्ये २०१९-२० मध्ये १.८ प्रतिशत वाढ होऊन हा वाटा १८.४ प्रतिशत एवढा झाला तर २०२०९२१ मध्ये कृषी क्षेत्राचा हिस्सा २०.२ प्रतिशत एवढा झालेला आहे. यावरून असे सिद्‌ध होते कि गेल्या तिन वर्षामध्ये शेती उत्पादनामध्ये वाढ होत आहे. मात्र हि वाढ लोकसंख्येचा विचार करता पुरेशी नाही सुरुवातीच्या काळात १९५०-५१ शेती क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नामधील हीस्सा हा ६५ ते ७० प्रतिशत एवढा होता मात्र अलीकडे उद्‌योग आणि सेवा क्षेत्राचा हिस्सा वाढत आहे आणि कृषी क्षेत्राचा हिस्सा कमी झालेला आहे कारण आपण जागतिकीकरणाचा स्वीकार केल्यामुळे अनेक देश आपल्या देशामध्ये कृषीमालाची निर्यात करतात. परीणामी देशीमालात बाजारपेठ मिळत नाही. तसेच मालाचा दर्जा सुद्‌धा कमी प्रतीचा असतो त्यामुळे भारतातील शेती व शेतीमाल संकटात सापडला आहे. जागतिकीकरणामुळे भारतीय शेतीकर अनुकूल आणि प्रतिकूल असा दोन्ही स्वरूपाचा परिणाम झालेला आहे तो पुढीलप्रमाणे.

**अ) अनुकूल तंत्रज्ञानाचा वापर**

**१) आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर**

जागतिकीकरणामुळे प्रत्येक देश शेतीक्षेत्रामधील उत्पादन वाढविण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करू लागला. यामध्ये या क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञान वापरल्या जाऊ लागले त्यामुळे मशागतीचा खर्च कमी झाला.

**२) उत्पादनात वाढ**

आपले प्राथमिक क्षेत्र कृषी असल्याने नवीन तंत्रज्ञान व पाण्याच्या सोई निर्माण झाल्याने शेती उत्पादनात वाढ झालेली आहे.

**३) रोजगारात वाढ**

शेतीचे एकुण क्षेत्र जरी वाढले नसले तरी शेतीमध्ये घेण्यात येणाऱ्या पिकांची संख्या वाढलेली आहे. खरीप आणि रब्बी अशी दोन पिके शेतकरी घेत असल्याने एकुण रोजगारात वाढ झाल्याचे दिसून येते.

**४) प्रक्रिया उद्योगांमध्ये वाढ**

शेती उत्पादन आणि बाजारपेठ ह्या दोन वेगवेगळ्या गोशी आहेत. शेतकरी उत्पादन घेतल्यानंतर त्याला योग्य बाजारपेठ मिळत नाही. परीणामी त्याला मातीमोल भाव मिळतो. आता अलीकडे सरकारने MSME द्वारा अनेक राज्यामध्ये प्रक्रिया उद्योग उभे केलेले आहेत त्यामुळे शेतमालाला योग्य भाव मिळत आहे.

**५) अद्ययावत बाजारपेठा**

जागतिकीकरणामुळे आपला माल जगात कुठेही विकत येतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत शेतीमालाला मिळणारा भाव आणि त्यामधील चढ-उतार याची अद्ययावत माहिती मिळते त्यामुळे आपला माल कुठे विकायचा हे शेतकरी ठरवतो.

**६) निर्यातीमध्ये वाढ**

जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारावरील अनेक बंधने आणि निर्बंध कमी केलेले आहेत. वाहतुकीच्या आणि संदेशवहनाच्या सोई सुद्धा स्वस्त झालेल्या आहेत. परीणामी देशाच्या कृषी मालाच्या निर्यातीत वाढ झाल्याचे दिसून येते.

वरील सर्व सकारात्मक परिणाम भारतीय शेतीवर झाल्याचे दिसून येते असे असले तरी काही प्रतिकूल परीणाम भारतीय शेतीवर झाल्याचे दिसत आहे.

**१) आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव**

विविध देशांमध्ये (इस्त्रायल, डेन्मार्क) नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येते आहे. त्यामुळे या देशामध्ये दर एकरी उत्पादन वाढत आहे. आपणाकडे या सोयींचा अभाव असल्याने आपले एकरी उत्पादन कमी होत आहे.

**२) उत्पादन खर्चात वाढ**

अलीकडे नवनवीन बियाण्यांचा वापर शेतीसाठी करण्यात येत आहे मात्र त्यावर येणारी किड आणि तत्सम रोग दूर करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर महागड्या औषधांची फवारणी करावी लागते. तसेच निंदण, खुरपन आणि पिकांची मळणी करण्यासाठीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे.

**३) बाजारभावात अनियमितता**

शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने उत्पदीत केलेला शेतमाल कितीही चांगल्या प्रतीचा असला तरी त्याला योग्य बाजारभाव मिळेलच याची खात्री नसते, कधी-कधी तर हा शेतमाल मातीमोल भावाने शेतकऱ्यांना विकावा लागतो.

**४) सिंचनाच्या सोईचा अभाव**

भारतीय शेती हि मोसमी वाऱ्याच्या भरोशावर केली जाते. यामध्ये खूपच अनियमितता असते कधी, अतिवृष्टी तर कधी अवर्षण अशा परिस्थितीत त्याला अपेक्षित उत्पादन मिळत नाही.

**५) शेतमालाची अनावश्यक आयात**

देशाचे आयात-निर्यात धोरण हे परिस्थितीनुरूप असले पाहिजे. अनेकदा देशात उत्पादित मालाचा साठ भरपूर असला तरी त्याच शेतमालाची आयात केली जाते. त्यामुळे देशातील शेतकऱ्यांचे नुकसान होते.

वरील सर्व दोष आणि अडचणी भारतीय शेती आणि शेतकऱ्यांसमोर असल्या तरी त्यामध्ये काही उपाययोजना केल्यास शेतीची उत्पादकता आणि उत्पादन वाढू शकते अशा काही उपाययोजना पुढीलप्रमाणे.

**१) निर्यातीला प्रोत्साहन**

उत्पादित शेतमालाची निर्यात लवकर केल्यास शेतमालाला चांगला भाव मिळू शकतो उदा. केळी, कांदा, द्राक्ष, संत्र, दुग्धजन्य पदार्थ इत्यादी च्या निर्यातीचे धोरण लवचिक असावे.

**२) हमीभावाची हमी**

शेतमालाला जे हमीभाव जाहीर झालेले आहे त्यानुसार सरकारने शेतमाल खरेदी करणे अपेक्षित असते. मात्र सरकार हि खरेदी पूर्णपणे करीत नाही आणि खरेदी केली तरी त्याचा मोबदला लवकर देत नाही

**३) सिंचनाच्या पुरेशा सोई**

इतर देशाच्या तुलनेत भारताकडे शेतीचे क्षेत्र खूप मोठ्या प्रमाणात असले तरी त्यासाठी सिंचनाच्या सोई पुरेशा नाहीत. यासाठी सिंचनाच्या सोई उपलब्ध करून द्याव्यात.

**४) कमी व्याजदरात कर्ज उपलब्धता**

शेतकऱ्यांना शेती उत्पादनासाठी कमी व्याज दराने कर्जाची उपलब्धता करून दिल्यास तो अधिक मोठ्या प्रमाणात शेतीमध्ये उत्पादन घेऊ शकतो.

**५) पुरक व्यवसायास प्रोत्साहन**

शेती सोबतच शेतीवर आधारित पूरक-उद्योग प्रक्रिया उद्योग करणे गरजेचे आहे. त्यामुळे शेतीसाठी लागणारा लागवड खर्च मिळू शकतो त्यामुळे या उद्योगांना चालना देणे गरजेचे आहे.

**समारोप**

भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये कृषी क्षेत्र हिस्सा जरी उभा असला तरी वाढत्या लोकसंख्येचा भर इतर क्षेत्राऐवजी कृषी क्षेत्रावरच पडतो. आजही ६५% लोक शेतीवर अवलंबून आहे आणि यापुढेही शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने आपणास कृषी क्षेत्राच्या विकासाशिवाय पर्याय नाही. कारण आपण उद्योग आणि सेवा क्षेत्रामध्ये खूप भरीव अशी कामगीरी करू शकलो नाही. आधुनिक तंत्रज्ञान आणि डीजीटल युगामुळे या दोनही क्षेत्रामधील रोजगार घाटात आहे. परीणामी आपल्याकडे असलेले विशाल असे कृषी क्षेत्र आणि त्यामध्ये नवनवीन तंत्रज्ञान वापरून शेतीची उत्पादकता आणि उत्पन्न वाढविल्यास देशाची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल यामध्ये तिळमात्र शंका नाही.

**संदर्भ -**

१) योजना - सप्टेंबर २०२१

२) विविध वृत्तपत्र कात्रण